# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेस नोट ३७९-२०२४ दिनांक :- ११/१०/२०२४

**"शेअर मार्केट मध्ये ऑनलाईन गुंतवणुक करण्यास सांगुन केलेल्या फसवणुकीतील १,२०,०००/- रक्कम तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश"**

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील वालीव पोलीस ठाणेचे हद्दीतील तक्रारदार नामे श्री. कायल यांना व्हॉटसअप खात्यावर अनोळखी ग्रुपमध्ये ॲड करण्यात आले. सदर ग्रुपमध्ये शेअर मार्केमध्ये गुंतवणुक करुन नफा मिळविण्याबाबत मॅसेज पाठविण्यात आले होते. तक्रारदार यांनी ग्रुपच्या माध्यमातुन रक्कमेची गुंतवणुक केली. परंतु कोणताही परतावा न मिळाल्याने आपली आर्थिक फसवणुक झाल्याचे तक्रारदार यांचे लक्षात आल्याने त्यांनी सायबर पोलीस ठाणे येथे तक्रार दिल्याने तक्रारीची नोंद घेवुन पुढील कारवाई करण्यात आली.

**(सायबर पोलीस ठाणे येथे अर्ज आवक क्रमांक १५२१ -बी/२०२३ अन्वये.)**

तक्रारदार यांचे प्राप्त तक्रारी अर्जाचे अनुषंगाने माहितीचे अवलोकन केले असता त्यांची फसवणुकीची रक्कम वेगवेगळया बँक खात्यात वर्ग झाल्याचे दिसुन आले. संशयीत बँक खात्यांची महिती प्राप्त करुन तात्काळ संबंधीत बँकेसोबत पत्रव्यवहार केल्याने तक्रारदार यांची रक्कम वेळीच संशयीत बँक खात्यांमध्ये गोठविण्यात आली. त्यानंतर तक्रारदार यांची रक्कम त्यांचे मुळ खात्यात जमा होणेकरीता मा. न्यायालयात वेळोवेळी पाठपुरावा करुन तक्रारदार यांची फसवणुक झालेल्या रक्कमेपैकी १,२०,०००/- रक्कम मा. न्यायालयाचे आदेशाने तक्रारदार यांचे मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **Share Market, Forex Trading, Crypto Investment, Mutual Funds** मधील गुंतवणुक करण्याअगोदर आपल्या वितीय सल्लागारासोबत चर्चा करुनच गुंतवणुक करा.
- **Telegram Channel, facebook,Instagram** अथवा **Watsapp** वर जास्त परतावा देणा-या **Promotional Adds** वर विश्वास ठेवु नका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.
- अश्या प्रकारच्या फसवणुकीमध्ये **Telegram Channel, Watsapp Group** वर ॲड करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे याचे **Sceenshot, Massages** दाखवुन पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत केले जाते. गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी सेबीची बनावट प्रमाणपत्रे दाखवुन फसवणुक करण्यात येते. एकदा गुंतवणुकदारांचा विश्वास जिंकला की, हे लोक गुंतवणुकदारांना जास्त व खात्रिशिर परताव्याची हमी देतात. अशा गुंतवणुकीमध्ये आर्थिक फसवणुक होण्याचा धोका मोठया प्रमाणात असतो.
- जास्त परतावा देण्याचे आमिष दाखविणा-या कोणत्याही ट्रेडिंग ॲपवर विश्वास ठेवु नये. तसेच ट्रेडिंग ॲपची विश्वासार्हता तपासुन गुंतवणुक करु नये.
- आपली वैयक्तिक माहिती, बँकेची गोपनीय माहिती कोणासही उघड करु नये.
- ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच **www.cybercrime.gov.in** अथवा **1930** या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर,सफौ/मिलाग्रिस फर्नांडिस, पोअं/सावन शेवाळे, पोअं/प्रशांत बोरकर, मपोहवा/माधुरी धिंडे यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**

**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**

**----0000----**